**ग्रामपंचायत सक्षमीकरणात महिलांचा सहभाग महत्त्वाचा; पोखर्णी येथे 'पंचायत राज दिन' उत्साहात साजरा**

**पोखर्णी (नांदेड):**

ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासात ग्रामपंचायतींची भूमिका महत्त्वाची असून, निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढणे काळाची गरज आहे, कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड -1 चे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देवीकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त पोखर्णी ग्रामपंचायत येथे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय अनुसंधान परिषद नवी दिल्ली च्या गीताने झाली

ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना डॉ. अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) यांनी ग्रामपंचायत सक्षमीकरण आणि महिलांच्या हक्कांवर सविस्तर मार्गदर्शन केले. महिलांनी केवळ पदावर न राहता निर्णय क्षमतेत स्वतःला सिद्ध करावे आणि ग्रामविकासाच्या ध्येयधोरणांत सक्रिय सहभाग नोंदवावा व तसेच डिजिटल साक्षरता चे ज्ञान अवगत करावे असे त्यांनी आवर्जून सांगितले.

सौं.अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ)यांनी ग्रामीण भागातील महिला आणि मुलांच्या आरोग्यावर भाष्य केले. बदलत्या जीवनशैलीत पोषण आहाराचे महत्त्व किती आहे आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या पदार्थांतून आरोग्य कसे जपावे, याबद्दल त्यांनी मोलाचा सल्ला दिला.

शेती विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. संदीप जायभाये (कृषि विद्या तज्ञ) यांनी संतुलित खत वापराचे महत्त्व पटवून दिले. विनाकारण खतांचा अतिवापर टाळून जमिनीचा पोत कसा राखता येईल आणि उत्पादन खर्च कमी करून उत्पादन कसे वाढवता येईल, याची तांत्रिक माहिती त्यांनी शेतकऱ्यांना दिली.

यानंतर पोखर्णी,ग्रामपंचायत उपसरपंच सौं. सोनाली बोकारे यानी के.वि.के. पोखर्णी च्या उपक्रमाचे कौतुक करत महिला चा हक्क, आरोग्य व डिजिटल साक्षरता याची अंमलबजावनी करू आशे आवाहन केले. या कार्यक्रमाला स्थानिक, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ, विशेषतः महिलांची उपस्थिती होती. पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून गावाचा कायापालट करण्याचा निर्धार यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.या कार्यक्रमासाठी के.वि.के. पोखर्णी चे दत्ता कदम यांचे सहकार्य लाभले आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.












कृषि विज्ञान केंद्र,पोखर्णी,नांदेड-१
संतुलित खतांचा वापर
जनजागृती मोहिम
Awareness Campaign on
Balanced Use of Fertilizers